स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 03–05–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 12. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 2. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 61</u> :— कन्हान जलशुध्दीकरण केन्द्र व पंपींग स्टेशन, कामठी येथे अखंडीत वीज पुरवठा ठेवण्याकरिता, कन्हान स्थित 220 KV सब–स्टेशन मधून आणावयाच्या 33 KV dedicated feeder व त्या अनुषंगाने, कन्हान जलशुध्दीकरण केंद्रात बदलावयाच्या आवश्यक उपकरणांसह करावयाच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. वीज वितरण कं. मर्यादित ( महाडिस्कॉम) ने कन्हान जलशुध्दीकरण केंद्राकरिता dedicated feeder व्दारे विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देण्याकरिता निविदा बोलविल्या असता जास्त दराच्या प्राप्त झाल्यामुळे येणाऱ्या अतिरिक्त रु. 63,26,027/— खर्चाचे भुगतान महाडिस्कॉमला करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. या कामाकरिता या आगोदर रु.6,51,85,920/— मंजुर खर्च व वरील प्रमाणे रु. 63,26,027/— असा एकूण खर्च रु. 7,15,11,947/— च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. महाडिस्कॉमने मागणी केल्याप्रमाणे सदर्हु कामाच्या कार्यान्वयनाचे दरम्यान Right of work (ROW) Price व Variation मुळे येणाऱ्या अतिरिक्त खर्चाचे भुगतान म.न.पा. करण्यास तयार आहे. असे संमतीपत्र देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 62</u> :— प्रवर्तन विभाग तसेच क्षेत्रिय कार्यालय मार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करतांना जप्त करण्यात आलेले साहित्य सिताबर्डी किल्ला येथील गोडावून मध्ये तसेच झोन कार्यालयाच्या परिसरात ठेवण्यात आले असून मागील 1997 वर्षापासून या साहित्याची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही.

उपरोक्त बाबतीत स्थायी समिती ने ठराव क्र. 172 दि. 12.11.12 अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली. त्याप्रमाणे Offset Price ठरविण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक अधिकाऱ्यांची व मा. पदाधिकाऱ्यांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती परंतु हया संयुक्त समितीची बैठक तसेच निरीक्षण न झाल्याने तसेच नव्याने स्थायी समिती गठीत झाल्याने नव्याने खालील अधिकाऱ्यासह स्थायी समितीतील मा. स्थायी समिती सदस्याचे नांवे निश्चित करण्याकरिता नस्ती स्थायी समितीकडे सादर.

1. श्री.होतवाणी, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) 2. श्री. गायकवाड (प्रभारी) नगरयंत्री 3. श्री.तालेवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम) (प्रभारी) 4. श्री.जामगडे, नियंत्रण अधिकारी (प्रवर्तन विभाग) 5. संबंधित झोनचे सहा. आयुक्त झोन क्र. 1 ते 10 व 6. श्री.गजभिये, प्रवर्तन अधिक्षक

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन महानगरपालिकेच्या ईतर विभागातही पडून असलेल्या भंगाराचा समावेश करुन प्रस्तावित उपसमितीत स्थायी समिती सदस्यांचे नांवे निश्चित करण्याचे अधिकार अध्यक्ष स्थायी समिती यांना प्रदान करुन प्रस्तावित विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 63</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर